13 जिल्ह्यांमधील नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र. रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.१/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०३/०२/२०१८.

प्रति,

जिल्हाधिकारी,
रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक,
जळगाव, औरंगाबाद, लातूर, नांदेड, यवतमाळ व नागपूर. (१३ जिल्हे)

विषय :- १३ जिल्ह्यांमधील नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम - २०१८.

संदर्भ :- १. आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.१०/का-०६, दि.१५/०६/२०१६ चे पत्र.
२. आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१७/प्र.क्र.१६/का-०६, दि.०७/११/२०१७ चे पत्र.
३. आयोगाचे क्र. रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.१/का-६, दि. ०३/०२/२०१८ रोजीचे ओदश.

महोदय / महोदया,

भारतीय संविधानातील तरतुदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्यांच्या मुदत समाप्तीपूर्वी व नवनिर्मित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरात लवकर घेणे बंधनकारक असल्याने राज्य निवडणूक आयोगाने खाली नमूद केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकांकरिता संदर्भ क्रमांक १ व २ द्वारे प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

(i) औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर नगर परिषदेचा मुदत समाप्तीचा दि.२८/१२/२०१६ असा होता. तथापि, न्यायालयीन प्रकरणामुळे वैजापूर नगर परिषदेच्या अध्यक्ष पदाची व सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सुरु असलेला कार्यक्रम रद्द करण्यात आला होता. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.२४/०१/२०१८ च्या आदेशानुसार वैजापूर नगर परिषदेच्या अध्यक्ष पदाची व सदस्य पदांची सार्वत्रिक निवडणूक घेणे आवश्यक आहे. (परिशिष्ट-१) वैजापूर नगर परिषदेच्या सार्वत्रिक

निवडणुकीकरिता आयोगाने दि.१५/०६/२०१६ रोजीच्या दिलेल्या प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीच्या कार्यक्रमानुसार दि.१६/०८/२०१६ रोजी प्रभाग रचनेची अंतिम अधिसूचना प्रसिध्द झालेली आहे.

(ii) १६ एप्रिल, २०१८ ते २८ एप्रिल, २०१८ या कालावधीत मुदत संपणारी - १ नगरपरिषद व ३ नगरपंचायती तसेच नव्याने स्थापन झालेली १ नगरपंचायत (परिशिष्ट-१)

(iii) पोट निवडणुका - अन्य नगरपरिषदा / नगरपंचायतींमधील १३ रिक्त सदस्य पदे (परिशिष्ट-२)

२. प्रभाग रचनेची कार्यवाही पूर्ण झाल्याने आता निवडणुकांसाठी पुढील कार्यवाही करावयाची आहे.

३. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोग स्वतंत्रपणे मतदार यादी तयार करत नसून भारत निवडणूक आयोगाकडून तयार होणारी विधानसभेची मतदार यादी वापरतो. याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदानाचा संभाव्य दिनांक लक्षात घेऊन मतदार यादी तयार करण्यासाठी एक विशिष्ट दिनांक (Cut off date) अधिसूचित केला जातो. (महाराष्ट्र नगरपरिषदा व नगर पंचायती अधिनियम १९६५ च्या कलम ११ अन्वये)

३.१ तसेच ज्याअर्थी, आयोगाने सं.क्र. ३ येथील आदेशानुसार महाराष्ट्र नगर परिषदा व नगर पंचायती अधिनियम विधान सभेची मतदार यादी नगर परिषदा / नगर पंचायतींच्या प्रभागानुसार विभागून ती सार्वत्रिक / पोट निवडणुकीकरिता तयार करणे व अधिकाऱ्यांनी अधिसूचित करणे, या प्रयोजनासाठी दि. १० जानेवारी २०१८ हा विहित दिनांक अधिसूचित (Cut off date) केला आहे (प्रत संलग्न). या विशिष्ट दिनांकास अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करून वरील निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

४. दिनांक १०/०१/२०१८ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे नगर परिषद / नगर पंचायतींसाठी प्रभागनिहाय विभाजननासाठी पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

५. **मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती :- दि.०१ जानेवारी २०१८ हा अर्हता दिनांक धरुन मा. भारत निवडणूक आयोगाकडून बुधवार दि. १० जानेवारी २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात येणारी महाराष्ट्र विधान सभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्याकरिता वापरण्यात यावी.** तसेच दि.१०/०१/२०१८ रोजी प्रसिध्द झालेली विधानसभेची मतदार यादी प्रभागनिहाय विभाजन करून परिशिष्ट-१ व २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे नगर परिषदा व नगर पंचायतींच्या सदस्य व अध्यक्ष पदांच्या अनुक्रमे सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

६. वरील मतदार यादी ग्राह्य धरुन उपरोक्त नगर परिषद / नगर पंचायतींच्या सार्वत्रिक / रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम खालील (परिशिष्ट-३) प्रमाणे राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : | दि.०९/०२/२०१८ |
| (ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | : | दि.०९/०२/२०१८ ते दि.१६/०२/२०१८ |
| (iii) | प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या तयार करणे | : | दि.२१/०२/२०१८ |
| (iv) | मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे | : | दि.२६/०२/२०१८ |
| (v) | प्रभागनिहाय व मतदान केंद्र निहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्दीची सूचना देणे | : | दि.०३/०३/२०१८ |

## ७. प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-

७.१ संबंधित मुख्याधिकारी यांनी विधानसभेच्या मतदार याद्यांचे खालील बाबींचा विचार करुन प्रभागनिहाय विभाजन करावे :-

(i) संबंधीत जिल्हाधिकारी यांनी आवश्यक ते विधानसभा क्रमांक, मतदार संघ व यादी भाग क्रमांक इ. प्रमाणे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून आवश्यक विधानसभा मतदार संघाची मतदार यादी प्राप्त करुन घ्यावी.

(ii) आयोगातील संगणकीकरण कक्षाकडून तयार केलेले यूजर आयडी व पासवर्ड प्राप्त करुन घ्यावे.

(iii) यूजर आयडी व पासवर्ड प्राप्त झाल्यानंतर Election Assembly Master, Ward Master इ. अपलोड करावे. कंट्रोल चार्ट तयार करुन तो योग्य असल्याची खात्री करावी व संगणकीकरण कक्षाकडूनही तो योग्य असल्याची खात्री करुन संगणक प्रणालीमधून मतदार यादीच्या PDF तयार करावे.

## ७.२ प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढील बाबींची खात्री करुन घ्यावी :-

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित नगर परिषद / नगर पंचायतीच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि नगर परिषद / नगर पंचायतीकरिता तयार केलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे. म्हणजेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतील किंवा रिक्त पदांच्या संबंधीत प्रभागातील सर्व मतदार, प्रारुप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अथवा प्रभागाच्या हद्दीबाहेरील मतदार, त्यामध्ये समाविष्ट झाले नाहीत याची खात्री करावी.

ब) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/मनपा-२००७/ प्र.क्र.६/का-५, दि.२४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी.

क) मयत अथवा स्थलांतरित मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्र.-रानिआ/मनपा-२०१०/ प्र.क्र.४/का.५, दि.११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ड) विधानसभेसाठी तयार केलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे इत्यादीबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/ प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक १७/०४/२०१५ चे आदेश)

७.३ महाऑनलाईनतर्फे तयार केलेल्या आज्ञावलीच्या मदतीने प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन करावे.

८. **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-**

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला संबंधित मुख्याधिकारी यांनी व्यापक प्रसिध्दी द्यावी. (परिच्छेद ११ प्रमाणे)

९. **प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन संबंधीत मुख्याधिकारी यांनी प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे :-**

९.१ संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दि.०९/०२/२०१८ ते दि.१६/०२/२०१८ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल.

(i) लेखनिकांच्या काही चुका.

(ii) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले.

(iii) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही, नगर परिषद / नगर पंचायतीच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

९.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर संबंधीत जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याने निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात.

१०. संबंधीत मुख्याधिकारी यांनी अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करुन त्याबाबतची सूचना विहित तारखेस प्रसिध्द करण्यात यावी. (परिच्छेद ११ प्रमाणे)

११. प्रारुप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस मुख्याधिकारी यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

(i) नगर परिषद / नगर पंचायतींचे मुख्य कार्यालय, प्रभाग समितीचे कार्यालय व इतर कार्यालयातील सूचनाफलक.

(ii) स्थानिक वृत्तपत्र

(iii) नगर परिषद / नगर पंचायतींच्या तहसील कार्यालयाचे सूचना फलक.

(iv) स्थानिक केबल टि.व्ही.

(v) जिल्हाधिकारी व नगर परिषद / नगर पंचायती यांचे संकेतस्थळ, इत्यादी.

(अ) मतदार यादीचा कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखाद्या नगर परिषदेच्या / नगर पंचायतीच्या सार्वत्रिक किंवा रिक्त पदांच्या पोट निवडणुकीबाबत न्यायालयाचे / शासनाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास सदर मतदार यादीचा कार्यक्रम रद्द करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने आयोगास तात्काळ सादर करावा.

१२. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी यांची राहील.

१३. आयोगाकडून देण्यात येणाऱ्या मतदार यादी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंदर्भात आयोगाचे नोडल अधिकारी (संगणकीकरण) यांच्याकडून आज्ञावली प्राप्त करुन घेण्यात यावी. यामध्ये काही तांत्रिक अडचणी असल्यास दूरध्वनी किंवा ई-मेलद्वारे त्यांच्याशी संपर्क साधण्यात यावा.

**सर्वश्री. समीर गंदपवार,नंदलाल कुचे व रितेश माटे (संगणकीकरण कक्ष)**

दूरध्वनी क्रमांक - ०२२-२२८८६९५० / २२०२२९०९, email - avinash.sanas@nic.in

१४. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

( री. वि. फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

कृ.मा.प.

प्रत:-

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
५. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त (सर्व)
६. जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर, रायगड, सातारा, धुळे, नंदुरबार, अहमदनगर, जालना, उस्मानाबाद, बीड, परभणी, हिंगोली, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली.
७. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
८. मुख्याधिकारी संबंधित नगरपरिषदा / नगर पंचायती
९. प्रशासक तथा तहसिलदार, आजरा नगर पंचायत अजारा जि. कोल्हापूर
१०. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
११. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१२. निवड नस्ती (का-६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

# नगर परिषदा / नगर पंचायतींचे नावे

## परिशिष्ट -१ ( सार्वत्रिक निवडणुकांसाठी)

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.१/का-६,
दि.०३/०२/२०१८ सोबतचे सहपत्र.

| अ.क्र. | जिल्हा | नगर परिषदा/नगरपंचायतींचे नावे | मुदत समाप्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | वैजापूर | २८/१२/२०१६ |
| २ | रत्नागिरी | गुहागर | २८/०४/२०१८ |
| ३ | रत्नागिरी | देवरुख | २८/०४/२०१८ |
| ४ | सिंधुदूर्ग | कणकवली | १६/०४/२०१८ |
| ५ | जळगाव | जामनेर | २८/०४/२०१८ |
| ६ | कोल्हापूर | आजरा | नवनिर्मित |

# नगर परिषदा / नगर पंचायतींचे नावे

## परिशिष्ट -२ (पोट निवडणुकांसाठी)

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.१/का-६,दि.०३/०२/२०१८ सोबतचे सहपत्र.

| अ.क्र. | जिल्हा | नगर परिषदा/नगरपंचायतींचे नावे | प्रभाग क्रमांक व जागा क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | रत्नागिरी | ३-ब |
| २ | पुणे | आळंदी | १-अ |
| ३ | सांगली | तासगाव | ६-अ |
| ४ | सोलापूर | दुधनी | २-अ |
| ५ | सोलापूर | दुधनी | ४-ब |
| ६ | नाशिक | सटाणा | ६-अ |
| ७ | जळगाव | पाचोरा | ६-ब |
| ८ | जळगाव | सावदा | ३-ब |
| ९ | लातूर | देवणी | १० |
| १० | नांदेड | कुंडलवाडी | ५-ब |
| ११ | यवतमाळ | कंळब | ४ |
| १२ | नागपूर | मोहपा | ६-अ |
| १३ | नागपूर | वाडी | १ |

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.१/का.६, दि.०३/०२/२०१८ सोबतचे सहपत्र

## परिशिष्ट - ३

## नगर परिषदा/नगरपंचायतींकरिता (सार्वत्रिक/पोट निवडणुका) मतदार यादीचा कार्यक्रम-२०१८

(i) दि.२८/१२/२०१६ रोजी मुदत समाप्त झालेली **वैजापूर** नगरपरिषदेच्या अध्यक्ष व सदस्य पदांची सार्वत्रिक निवडणूक (परिशिष्ट-१)

(ii) दि.१६/०४/२०१८ ते दि.२८/०४/२०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या **जामनेर** नगर परिषदेच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या तसेच **गुहागर, देवरुख, कणकवली** व नवनिर्मित **आजरा** या ४ नगरपंचायतींच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुका (परिशिष्ट-१)

(iii) नगर परिषदा/नगरपंचायतींच्या सोबतच्या परिशिष्ट-२ मधील नमूद **१३** रिक्त सदस्य पदांच्या पोट निवडणुका

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | १० जानेवारी, २०१८ |
| २ | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | ०९ फेब्रुवारी, २०१८ |
| ३ | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | ०९ फेब्रुवारी, २०१८ ते १६ फेब्रुवारी, २०१८ |
| ४ | प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या तयार करणे | २१ फेब्रुवारी, २०१८ |
| ५ | मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे | २६ फेब्रुवारी, २०१८ |
| ६ | प्रभागनिहाय व मतदान केंद्र निहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करणे व अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे | ०३ मार्च, २०१८ |

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(री. वि. फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

C:\Users\kesharsing.sulane\Desktop\नगर परिषद मतदार यादी कार्यक्रम २०१६ (Recovered).docx

RNI No. MAHBIL /2009/31748
Reg. No. MCS /174/2016 -18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—अ-मध्य उप-विभाग

वर्ष ४, अंक ६]  शनिवार, फेब्रुवारी ३, २०१८ / माघ १४, शके १९३९  [पृष्ठ १, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ फेब्रुवारी २०१८

**आदेश**

क्रमांक रानिआ / नप-२०१८ / प्र. क्र. १ / का. ६.— मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३) च्या कलम १९(ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम ७-अ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) च्या कलम १३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक १० जानेवारी २०१८ रोजी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार याद्या, या अधिनियमांतर्गत असलेल्या महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समितींच्या माहे एप्रिल, २०१८ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक / पोट निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील, असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**नि. ज. वागळे,**
प्रभारी उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

भाग एक-अ—(म.उ.वि.)—८-१

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.